बुधवार, दि ४ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २२ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# शून्यातून शिखराकडे; संघर्ष, जिद्द आणि सेवाभावाची यशोगाथा

## साईलता सामलेटी यांची शिक्षणाधिकारी (प्रा) नाशिक पदी पदोन्नती



सौ. साईलता कृष्णा सामलेटी
(सौ. साईलता नितीन रायपल्ली)

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील पद्मशाली समाजातील रामनगर विणकर कॉलनीसारख्या सर्वसामान्य परिसरातून उगम पावलेली एक तेजस्वी यशोगाथा म्हणजे सौ. साईलता कृष्णा सामलेटी (सौ. साईलता नितीन रायपल्ली) यांचा आजवरचा जीवनप्रवास. गरिबी, संघर्ष, मर्यादा आणि अडचणींवर मात करत त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली असून आज त्यांची जिल्हा परिषद प्राथमिक विभाग, नाशिक येथे शिक्षणाधिकारी म्हणून पदोन्नती होणे ही केवळ वैयक्तिक उपलब्धी नसून संपूर्ण समाजासाठी अभिमानास्पद बाब आहे.

सौ. साईलता सामलेटी यांच्या जडणघडणीमागे त्यांचे वडील स्व. कृष्णा अंबय्या सामलेटी यांचा संघर्षमय जीवनप्रवास प्रेरणादायी ठरला. कोणाचाही आधार नसताना लहानपणी बिडी कामगार म्हणून काम करणे, जुनी एमआयडीसीतील पॉवरलूममध्ये सुपरवायझर म्हणून नोकरी करणे आणि त्याचबरोबर स्वतःचे शिक्षण पूर्ण करून बी.एस्सी., बी.एड. पर्यंत मजल मारणे, हे खऱ्या अर्थाने जिद्दीचे प्रतीक आहे. त्यांनी स्वतः शिकत असतानाच आपल्या पत्नीला डी.एड. शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. ''शून्यातून विश्व निर्माण करणारे आई-वडील'' ही उपमा त्यांच्या आयुष्याला अगदी साजेशी ठरते.

या संस्कारांच्या शिदोरीवर सौ. साईलता सामलेटी यांनी शिक्षण क्षेत्रात पाऊल ठेवले. सन २००० मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी सौ. राधिका रस्तोगी यांच्या कार्यकाळात त्यांची जिल्हा परिषद शिक्षिका म्हणून निवड झाली. देवपिंपळगाव (जालना) येथे २००० ते २००२ आणि त्यानंतर श्रीरामपूर येथे २००२ ते २०१४ या काळात त्यांनी एक आदर्श शिक्षिका म्हणून कार्य केले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी, शाळेच्या शैक्षणिक वातावरणासाठी आणि पालक-शिक्षक समन्वयासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला.

याच काळात त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग () परीक्षेची तयारी करून २०१४ मध्ये यश संपादन केले आणि उपशिक्षणाधिकारी म्हणून निवड झाली. त्यानंतर २०१४ ते २०१७ : गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती नेवासा, २०१७ ते २०२१ : गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती संगमनेर, २०२१ ते २०२५ : गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर, जून २०२५ पासून : गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती नेवासा या प्रत्येक ठिकाणी त्यांनी प्रशासन, शिक्षक, मुख्याध्यापक आणि पालक यांच्यात समन्वय साधत शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी ठोस पावले उचलली. शिक्षक प्रशिक्षण, शाळा गुणवत्ता मूल्यांकन, डिजिटल शिक्षण, पटसंख्या वाढ, गळती थांबविणे अशा अनेक उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला. आज त्यांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद नाशिक या महत्त्वाच्या पदावर पदोन्नती मिळणे हे त्यांच्या कार्याची पावती आहे. ही पदोन्नती केवळ त्यांची वैयक्तिक प्रगती नसून, सामान्य कुटुंबातील मुलीही मेहनत, चिकाटी आणि प्रामाणिक सेवाभावाच्या जोरावर सर्वोच्च प्रशासकीय पदांपर्यंत पोहोचू शकतात, याचे जिवंत उदाहरण आहे. त्यांचे बंधू इंजिनिअर राजू कृष्णा सामलेटी (, फ्लोरिडा अमेरिका), शिक्षक व समाजसेवक आशिष (सोनू) कृष्णा सामलेटी, तसेच पती श्री. नितीन दत्तात्रय रायपल्ली (हायस्कूल शिक्षक, श्रीरामपूर) यांचेही त्यांच्या प्रवासात मोलाचे सहकार्य लाभले आहे. सौ. साईलता सामलेटी यांची ही यशोगाथा आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून, विशेषतः ग्रामीण भागातील मुलींना मोठी दिशा देणारी आहे. त्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या हातून नाशिक जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण व सर्वसमावेशक होवो, हीच सदिच्छा.

जिल्हा परिषदेत गुत्तेदाराची दादागिरी; पत्रकाराला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ अन् धक्काबुक्की!

# माहिती पुरवणाऱ्या त्या कर्मचाऱ्याचे निलंबन करा

### संपादक भरत मानकर यांची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे धाव

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात बातमीच्या संदर्भात माहिती घेण्यासाठी गेलेले दैनिक जनश्वासचे संपादक भरत मानकर यांना एका गुत्तेदाराने अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे जिल्हा परिषद वर्तुळात खळबळ माजली असून, संबंधित गुत्तेदारावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासह त्याला माहिती पुरवणाऱ्या भ्रष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांनी तातडीने कारवाईचे निर्देश दिले आहेत.

सोमवार, २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ ते १:३० च्या सुमारास भरत मानकर हे बांधकाम विभागातील सहाय्यक लेखाधिकारी श्री. हारुण यांच्या केबिनमध्ये बसले होते. यावेळी त्या ठिकाणी बांगड नावाचा गुत्तेदार आला. मानकर हे बातमीसाठी माहिती गोळा करत असल्याचे कळताच या गुत्तेदाराचा संयम सुटला. त्याने ''कोण पत्रकार आहे...'' म्हणत अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता ''आमच्या कामाचे बिल रोखण्याचा प्रयत्न करतोय, याचे हातपाय तोडून टाकू, याला लय मस्ती आली आहे,'' अशा धमक्या देत त्याने मानकर यांना धक्काबुक्की केली.

**जीवे मारण्याची धमकी आणि तक्रार**

या गुत्तेदाराने मानकर यांना जीवे मारण्याची धमकी दिली असून, त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

**प्रशासनातील घरभेदी कोण?**

एखादा पत्रकार शासकीय कार्यालयात माहिती घेण्यासाठी आला आहे, ही बातमी तात्काळ संबंधित गुत्तेदारापर्यंत पोहोचतेच कशी? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. बांधकाम विभागातील कोणत्या कर्मचाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने ही माहिती गुत्तेदाराला दिली, याची सखोल चौकशी करून त्या संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करावे, अशी आक्रमक मागणी भरत मानकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी () यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

**कामांच्या चौकशीची मागणी**

या गुत्तेदाराने केलेल्या **पान २ वर**

## जिल्हास्तरीय टी.बी. फोरमची बैठक संपन्न

# क्षयरोगाच्या समुल उच्चाटनासाठी समन्वयाने कामे करावीत - जिल्हाधिकारी



**जालना । प्रतिनिधी -** टीबीमुक्त भारत हे स्वप्न साकार करण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रम राबविला जात आहे. जिल्ह्यात क्षयरुग्णांचे गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रमाण कमी होवून मृत्यदरही घटला आहे. क्षयरोग हा संसर्गजन्य रोग आहे. क्षयरोग हा जीवाणूजन्य आजार असून तो योग्य औषधोपचाराने पुर्णपणे बरा होतो. तरी आरोग्य विभागाने अधिकाधिक जनजागृती करत क्षयरोगाच्या समुळ उच्चाटनासाठी समन्वयाने कामे करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमातंर्गत जिल्हास्तरीय टी.बी. फोरमची बैठक पार पडली. याप्रसंगी त्या बोलत होत्या. या बैठकीस जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.गोपाल कुडलीकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे, क्षयरोग वैद्यकिय अधिकारी, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक, प्रयोगशाळा पर्यवेक्षकांसह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यातील **पान २ वर**

## संपादकीय

# पत्रकारांची गळचेपी म्हणजे लोकशाहीची हत्या

## पत्रकार संरक्षण कायदा आणि निर्भय पत्रकारितेची कसोटी

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेवर होणारे हल्ले ही केवळ एखाद्या व्यक्तीवर झालेली हिंसा नसून, ती थेट लोकशाही व्यवस्थेवर झालेली घाला असते. जालना जिल्हा परिषद कार्यालयात घडलेली घटना या वास्तवाचे विदारक दर्शन घडवते. बातमीच्या अनुषंगाने माहिती घेत असताना एका पत्रकारास शिवीगाळ, धक्काबुक्की आणि जीवे मारण्याची धमकी देण्यात येणे ही बाब अत्यंत गंभीर असून, ही घटना प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि समाजासाठी इशाराच आहे.

**पत्रकार का लक्ष्य बनतात?**

आजचा पत्रकार केवळ बातमी लिहिणारा नसून, तो भ्रष्टाचार उघड करणारा, जनतेचा आवाज बुलंद करणारा आणि सत्तेच्या कारभाराचा प्रश्न विचारणारा घटक आहे. त्यामुळे ज्यांचे गैरव्यवहार उघड होण्याची शक्यता असते, अशा व्यक्तींना पत्रकार हा शत्रूसारखा वाटू लागतो. जालना येथील घटनेतही हाच संशय बळावतो बातमी छापली जाण्याचा राग की भ्रष्टाचार उघड होण्याची भीती? दोन्ही परिस्थितीत दोषी मानसिकता हीच आहे.

**पत्रकार संरक्षण कायदा : अस्तित्वात पण निष्प्रभ?**

महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा अस्तित्वात आहे. या कायद्याचा उद्देश पत्रकारांवर होणारे हल्ले रोखणे, दोषींवर कठोर शिक्षा करणे आणि पत्रकारांना निर्भयपणे काम करण्यासाठी संरक्षण देणे हा आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक प्रकरणांत गुन्हे दाखल होण्यात विलंब, सौम्य कलमे लावणे किंवा तडजोडीचा मार्ग स्वीकारला जातो. यामुळे गुंड प्रवृत्तीच्या लोकांना संदेश जातो की, ''हल्ला केला तरी फार काही होत नाही.'' हीच बाब सर्वात धोकादायक आहे.

**पत्रकारावर हल्ला म्हणजे समाजाच्या हक्कांवर हल्ला**

पत्रकार हा समाजाचा प्रतिनिधी असतो. तो प्रश्न विचारतो, माहिती मिळवतो आणि सत्य समोर आणतो. पत्रकारावर हल्ला म्हणजे समाजाच्या जाणून घेण्याच्या अधिकारावर हल्ला होय. जर पत्रकार घाबरून गप्प बसू लागले, तर भ्रष्टाचार मोकाट सुटेल, अनियमितता वाढेल आणि सामान्य नागरिकांचे नुकसान होईल.

**प्रशासन आणि पोलीस यंत्रणेची जबाबदारी**

अशा घटनांमध्ये प्रशासनाची भूमिका निर्णायक ठरते. तात्काळ गुन्हा दाखल होणे, पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कठोर कलमे लावणे, आरोपीला अटक करून कडक कारवाई करणे, पत्रकारांना व माध्यम संस्थांना संरक्षण देणे. या गोष्टी केवळ औपचारिक न राहता प्रत्यक्षात अंमलात आणल्या गेल्या पाहिजेत. अन्यथा कायद्याचे अस्तित्व निरर्थक ठरेल.

**संघटीत पत्रकारिता हीच खरी ताकद**

आज आवश्यकता आहे ती पत्रकारांनी जाती, धर्म, पक्ष, संस्था यापलीकडे जाऊन एकत्र येण्याची. एका पत्रकारावर हल्ला झाला, तर तो सर्वांवर झालेला हल्ला समजून सामूहिक लढा उभा राहिला पाहिजे. शांततेच्या मार्गाने, पण ठामपणे, कायद्याच्या चौकटीत राहून आंदोलन, निवेदन, पाठपुरावा केला गेला पाहिजे.

**उपाययोजना काय असू शकतात?**

पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, प्रत्येक जिल्ह्यात पत्रकार संरक्षण कक्षाची स्थापना, सरकारी कार्यालयांमध्ये पत्रकारांसाठी स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा, हल्ला झाल्यास २४ तासांत कारवाईची सक्ती, दोषींना शिक्षा.

पत्रकारांची गळचेपी ही लोकशाहीची घुसमट आहे. आज जर समाजाने आणि प्रशासनाने एकत्र येऊन पत्रकारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले नाही, तर उद्या सत्याचा आवाज दबला जाईल. निर्भय पत्रकारिता टिकली तरच निर्भय लोकशाही टिकेल. म्हणूनच, पत्रकार संरक्षण कायदा हा केवळ कायद्याच्या पुस्तकात नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीत दिसला पाहिजे हीच आजची काळाची गरज आहे.

पान १ वरुन

## माहिती पुरवणाऱ्या ...

कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. भ्रष्टाचार उघड होईल या भीतीपोटीच त्याने पत्रकारावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला असावा, असा संशय व्यक्त करत या गुत्तेदाराच्या सर्वच कामांची तातडीने चौकशी करण्याची मागणीही मानकर यांनी केली आहे.

## क्षयरोगाच्या समुळ ...

सक्रीय क्षयरुग्णांचा संबंधित विभागाकडून आढावा घेण्यात आला. यामध्ये निष्पन्न झालेल्या क्षयरुग्णांची एचआयव्ही व आरबीएस तपासणी वेळोवेळी करुन घ्यावी. दरवर्षी टीबी जीवाणुंचे संशोधन करणारे डॉ. रॉबर्ट कॉक यांच्या प्रित्यर्थ २४ मार्च रोजी जागतिक क्षयरोग दिन साजरा करण्यात येतो. तरी सर्व सामान्य जनतेमध्ये क्षयरोग आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी क्षयरोग दिन कार्यक्रमाची मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी, टीबीमुक्त ग्रामपंचायतीच्या १० सरपंच यांचा सन्मान जागतिक क्षयरोग दिनानिमित्त करुन त्यांना प्रोत्साहीत करावे. जिल्ह्यात केंद्रीय क्षयरोग विभागाने क्षयरुग्णांना सामुदायिक सहाय्य मिळवून देण्यासाठी क्षय रुग्णांसाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत उपक्रमांतर्गत निक्क्षय मित्र कम्युनिटी सपोर्ट टू टीबी पेशंट हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत समाजातील दानशुर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, उद्योग समुह इत्यादीच्या माध्यमातून मदत उपलब्ध करुन देण्यात येते. वर्ष २०२५ मध्ये एकुण ९४० कोरडा पोषण आहार किटचे क्षयरुग्णांना वाटप करण्यात आला. यामध्ये कलश सिडस ६५०, मार्केट कमिटी जालना २०० आणि गजलक्ष्मी स्टील जालना ९० याचा समावेश आहे. वर्ष २०२६ मध्ये एकुण क्षय रुग्णांचे उद्दीष्ट २२५० असून याकरीता पुढील सहा महिन्यासाठी साधारणतः १३५०० कोरडा पोषण आहार किटची आवश्यकता आहे. तरी जिल्ह्यातील दानशुर व्यक्ती, संस्थांनी पुढाकार घेवून आपले योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जालना जिल्ह्यात १ जुलै ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत टीबीमुक्त भारत अभियान राबविण्यात आले. यामध्ये सर्व तालुक्यामध्ये ३ लाख ९७ हजार २१६ नागरिकांची तपासणी करण्यात आली. स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आले. यामध्ये विविध आरोग्य संस्थेत आरोग्य शिबिराचे आयोजन करुन अतिजोखीमग्रस्त भागातील ४७ हजार ४३६ महिलांची क्षयरोग विषयक आरोग्य तपासणी करण्यात आली. यातून ७७ रुग्ण पॉझिटीव्ह आढळून आले आहेत. जिल्हाभरात वर्ष २०२५ मध्ये क्षयरुग्णांमध्ये तंबाखुचे सेवन करणारे ५५ रुग्ण, धुम्रपान करणारे २५ रुग्ण आहेत. क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत अभियान जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यात राबविण्यात आले यात एकुण ७७८ ग्रामपंचायतीचा समावेश आहे. तर वर्ष २०२४ मध्ये एकुण ३३१ ग्रामपंचायती टीबीमुक्त म्हणून पात्र ठरल्या होत्या. तर वर्ष २०२५ मध्ये ५६६ ग्रामपंचायती टीबीमुक्त ग्रामपंचायती म्हणून पात्र ठरल्या आहेत. जानेवारी ते जुन २०२५ अखेरपर्यंत १०२८ क्षयरुग्ण उपचारावर आले त्यापैकी ९६८ रुग्णांची एचआयव्ही तपासणी करण्यात आली, यापैकी २० क्षयरुग्णांना एचआयव्ही असल्याचे निदान झाले असून या रुग्णांना सीपीटी व एआरटी सुरु करण्यात आली आहे. जालना शहर महानगरपालिकेअंतर्गत एकुण २९ क्षयरुग्ण उपचार घेत आहेत. अशी माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.गोपाल कुडलीकर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे उपलब्ध करुन दिली. क्षयरोगाचे वेळेत निदान होण्यासाठी वर्ष २०२६-२७ मध्ये तीन नवीन सिबीनॅट व ट्रनॅट मशिन तसेच ग्रामीण भागात ज्या ठिकाणी संशयित क्षयरुग्णांची एक्स-रे तपासणी मोफत करण्यासाठी नवीन चारचाकी निक्षय वाहनाची आवश्यकता असल्याची मागणीही यावेळी नोंदविण्यात आली.

# एक्सलेन्स एज्युकेयर तर्फे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नामांकित एक्सलेन्स एज्युकेयर क्लासेसच्या वतीने दहावीच्या विद्यार्थीना सेफरॉन हॉटेलमध्ये निरोप देण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थीसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर बहारदार नृत्य सादर करीत आपली कला सादर केली व सर्वांची मने जिंकली.

एक्सलेन्स एज्युकेयरचे संचालक शैलेश ठक्कर,भुषण देवीदान आणि शिक्षक नवीन मोर यांनी विद्यार्थीना परीक्षेसाठी व आयुष्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत परीक्षेसंबंधी सविस्तर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी जानव्ही ठक्कर, सोनाली देवीदान,कृष्णा शिराळे,डॉ. हिरल गणात्रा,सुरभी सकलेजा,प्रिया बदनापूरकर यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : अ‍ॅड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# जागतिक कर्करोग दिन : कर्करोगाचे प्राथमिक अवस्थेत रोगनिदान होणे आवश्यक

संपूर्ण जगामध्ये दरवर्षी ०४ फेब्रुवारी रोजी 'जागतिक कर्करोग दिन' साजरा करण्यात येतो. कर्करोगाबाबत लवकर निदान होणे, प्रतिबंध करणे, उपचार व जीवनशैलीचा वापर इत्यादी विषयी जनजागृती करणे हे मुख्य उदि्दष्ट आहेत. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उदि्दष्ट कर्करोगाचे प्रमाण व मृत्यू कमी करणे असुन, कर्करोगापासुन बचाव कसा करावा या बाबतची माहितीची जनजागृती करण्याचे उदि्दष्ट आहे.

असंसर्गजन्य आजारांची झपाट्याने वाढ होत असल्यामुळे कर्करोगाबाबतची माहिती जनतेस मिळणे आवश्यक आहे. कारण कर्करोग कोणालाही होवू शकतो. जागतिक आरोग्य संघटनेनुसार कर्करोग हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात घातक आजार आहे. अंतिम टप्प्यात असलेल्या कर्करोगामुळे मृत्यू होतो. कर्करोगामुळे मृत्यू होणाऱ्या लोकांची स्थिती भारतासाठी गंभीर आहे. कर्करोगामध्ये रोगांचा समुह असुन, त्यामध्ये असामान्य पेशी अनियंत्रितपणे वाढुन शरीराच्या अवयवमध्ये पसरतात. ॲन्कोलॉजी (कर्करोगाचा अभ्यास) आणि कर्करोगावरील संशोधनासाठी प्रशिक्षण व शिक्षणासाठी सुविधा प्रदान करणे आवश्यक आहे. ज्यामुळे कर्करोगामुळे होणारे मृत्यू टाळणे शक्य होईल.

कर्करागाच्या प्राथमिक अवस्थेत सतत अतिसार, अशक्तपणा, खोकला तोंडातुन रक्त येणे, स्तनातील गाठ, कर्करोगाच्या पहिल्या टप्प्यात कमीत कमी किंवा कोणतेही लक्षणे आढळुन येत नाही. यासाठी मेमोग्राम, ओ.व्ही. ई., व्ही.आय.ऐ., सिटी स्कॅन, एम.आर. आय., सोनोग्राफी, बायोप्सी इ. तपासणीमुळे कर्करोग अंतिम टप्प्यामध्ये जाण्यापुर्वी कर्करोगाचे निदान होते.




एच.पी.व्ही. (ह्युमन पॅपिलोमाव्हायरस) लसींमुळे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग टाळता येतो. तसेच हिपॅटायटीस बी या लसीमुळे यकृताचा कर्करोग होण्याचा धोका कमी होतो.

आज कर्करोगामध्ये विविध उपचार उपलब्ध आहेत. रुग्णांच्या शरीरामध्ये किंवा कोणत्या टप्प्यात आहे यावर उपचार पध्दती अवलंबुन आहे. कर्करोगाच्या उपचारामध्ये शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडियशन थेरपी, इम्युनोथेरपी, हार्मानथेरपी इ. प्रकाराचा वापर केला जातो.

कर्करोगाच्या पहिल्या टप्प्यात कमीत-कमी किंवा कोणतेही लक्षणे आढळुन येत नाही. याकरिता नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. कारण कर्करोग अंतिम टप्प्यात जाण्यापुर्वी कर्करोगाचे निदान होते. त्यामुळे पुढील मृत्यूचा धोका टळतो. लवकर निदान लवकर उपचारामुळे कमी खर्चात उपचार होतो. अर्थात उशीरा निदान झाल्यामुळे उपचार खर्चिक होतो. तसेच हॉस्पीटलमध्ये दीर्घकाळ ॲडमिट राहावे लागते.

संतुलीत आहार, फळे, हिरवा पालेभाज्या इ. समावेश असावा. नियमित व्यायाम करणे. अतिनील किरणोत्सर्गाचा संपर्क टाळणे, प्रदुषण, तंबाखु व मद्यपानाचे सेवन करु नये. रोगप्रतिकार शक्ती चांगली असल्याकारणाने कर्करोगाचा धोका कमी होतो. निरोगी जीवनशैली असावी.

जालना जिल्ह्यात सन २०२१ ते २०२५ या कालावधीत मौखिक कर्करोगाच्या ७५, ९५५ तपासणी करण्यात आल्यात यामध्ये १८४ रोगनिदान झाले असुन, १७३ औषधोपचाराखाली आहेत. तसेच स्तनाचा कर्करोगाच्या ३९,४३२ तपासणी करण्यात आल्यात यामध्ये १४२ रोगनिदान झाले असुन, १३३ औषधोपचाराखाली आहेत. गर्भाशय मुखाचा कर्करोगाच्या ५०,३८३ तपासणी करण्यात आल्यात यामध्ये १५८ रोगनिदान झाले असुन, १४१ औषधोपचाराखाली असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी दिली. जिल्ह्यातील ३० वर्षावरील स्त्री / पुरुष यांनी नियमित आपल्या आरोग्याची तपासणी करुन घ्यावी. तसेच अधिक माहितीसाठी टोल फ्रि क्रमांक १०४ / १०२ या हेल्पलाईनवर कॉल करावा.

**जिल्हा माहिती कार्यालय, जालना**

# परतुरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सर्वपक्षीय शोकसभा संपन्न

**परतूर । प्रतिनिधी -** राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना.अजितदादा पवार यांच्या अपघाती निधन पश्चात परतूर मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने दि.२ रोजी स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते.

येथील इंदिरा मंगल कार्यालयात संपन्न झालेल्या या शोकसभेला मा आ. सुरेशकुमार जेथलिया, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख ए जे बोराडे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे कपिल आकात, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख महेश नगळे,काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब आकात, माधवराव कदम,सुदर्शन सोळंके, नितीन जेथलिया, बाबासाहेब गाडगे, दिलीप चव्हाण, इंद्रजित घनवट, बाबुराव हिवाळे, राजेश खडेलवाल, डॉ. सातोनकर, अखिल काजी, शाकेर खतीब, स. वसिम, अंकुशराव तेलगड, सिधार्थ बंड, रहेमुसेठ कुरेशी, मोईनसेठ कुरेशी,मंगेश डहाळे,संजय राऊत, ऋषिकेश कराळे,अयुब कुरेशी,मुरलीधर देशमुख, डॉ. प्रदीप चव्हाण,डॉ.प्रमोद जगताप, बद्रीनारायण खवणे, सिद्धू सोळंके, कृष्णा आरगडे, अशोक उबाळे, शिवाजीराव भोसले, गणेश कुलकर्णी, प्रा. पांडुरंग नवल,ल सर,एकनाथ कदम, गौतम कोटेचा,महिला राष्ट्रवादी आघाडीच्या सौ.विश्रांती पट्टे, खाडे, अर्चना राऊत, सिद्धू अंभुरे सह मान्यवराची उपस्तिती होती. यावेळी श्रद्धांजलीपर शोक संदेश व्यक्त करताना माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी स्वर्गवासी अजित दादा यांच्या आठवणींना उजाळा देत एक कर्तबगार नेता व प्रशासनावर वचक असलेले सक्षम नेतृत्व या महाराष्ट्राने गमावले असल्याचे दुःख त्यांनी यावेळी व्यक्त केले. अतिशय शिस्त प्रिय व दूरदृष्टीचे नेते म्हणून स्वर्गवासी अजित दादा पवार यांची ओळख असल्याचे सांगत त्यांच्या निधनाने खूप मोठी न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली असल्याच्या भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.



तर आपल्या प्रास्ताविकात नितीन जेथलिया यांनी म्हंटले कि स्वर्गवासी अजित दादा हे कार्यकर्त्यांची निगडित असणारे नेते होत. जवळच्या कार्यकर्त्यांना नावानिशी आवाज देत हक्काने कामे करून देणारे नेते म्हणून त्यांचा परिचय होता. परतुर शहराच्या विकासासाठी अनेक निधी मंजूर करण्याबाबत स्वर्गवासी अजितदादा यांनी साकारात्मक भूमिका बजावली होती. त्यांनी राज्याला खरी गरज असतानाच आपण सर्वजण त्यांना मुकलो हे दुःख न सहन होणारे असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ए. जे.बोराडे यांनी दादांच्या मुलाखतीचा अनुभव व्यक्त करत राजकीय खेळी मध्ये तत्पर असणारे दादा विरोधकांना देखील आपलेसे करत होते व त्यांचात कार्यकर्त्या ओळखण्याची धमक होती अशा भावना व्यक्त केल्या तर राष्ट्रवादीचे जिल्हा युवा प्रमुख कपिल आकात यांनी दादांच्या आठवणींचा उजाळा देत कामानिमित्त जेव्हा जेव्हा त्यांची भेट व्हायचो तेव्हा आग्रहाने सन्मानाने वागणूक देत त्यांनी कामे मार्गी लावली असल्याची ग्वाही दिली. तर शिवसेना ऊबाठा गटाचे जिल्हाप्रमुख महेश नळगे यांनी बेधडक व्यक्तिमत्व म्हणून स्वर्गवासी अजित दादा यांचा उल्लेख केला. प्रशासनासह पक्षात व कार्यकर्त्यात देखील त्यांचा आदरयुक्त दरारा होता अशा भावना व्यक्त करत राज्याच्या जडणघडण्यासाठी स्वर्गवासी अजितदादाचे मोठे योगदान असल्याचा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.काँग्रेसचे बाळासाहेब आकात यांनीदेखील दुध व्यवसायासाठी दादांचे योगदान कश्याप्रकारे होते त्याबद्दल मत व्यक्त केले.

सदरील कार्यक्रमाला सर्व पक्षांची नगरसेवकांची राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी सर्वांच्या वतीने त्यांच्या प्रतिमेला पुष्प वाहण्यात आले. व दोन मिनिटे मौन पाळत श्रद्धांजली देण्यात आली.

# खोराडसावंगी सर्कल; सर्वसामान्य जनतेसाठी सदैव उभा राहणार- सुरेश पवार

**मंठा । योगेश राठोड -** ग्रामीण भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाई, रस्त्यांची दुरवस्था, वीजपुरवठा, आरोग्य सुविधा, शिक्षण व्यवस्था तसेच शेतकऱ्यांच्या विविध समस्या या बाबी प्राधान्याने सोडवण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करणार आहोत. सामान्य माणसाच्या अडचणी समजून घेऊन त्यावर तत्काळ उपाययोजना करणे हेच आपले मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.



खोराडसावंगी सर्कलमधील युवक, महिला, शेतकरी व कामगार वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवण्यात येतील. प्रत्येक गावात जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या जातील, असेही सुरेश पवार यांनी स्पष्ट केले.

''जनतेचा विश्वास आणि प्रेम हीच माझी खरी ताकद आहे. त्या विश्वासावर खरे उतरून प्रामाणिकपणे काम करणे हेच माझे ध्येय आहे,'' असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित कार्यकर्ते व ग्रामस्थांनी सुरेश पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत आगामी निवडणुकीत त्यांना भक्कम पाठिंबा देण्याची ग्वाही दिली. त्यांच्या या सकारात्मक भूमिकेमुळे खोराडसावंगी सर्कलमध्ये विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# नदी पात्रात कचरा टाकणाऱ्यावर जालना नगरपालिकेची मोठी कारवाई

## सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या कुंडलिका नदीचे प्रदूषण करणाऱ्यांविरुद्ध महानगरपालिका प्रशासनाने आता कडक पवित्रा घेतला आहे. नदी पात्रात अनधिकृतपणे राडारोडा आणि माती टाकून नैसर्गिक प्रवाहास अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका व्यक्तीवर सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमकी घटना काय? महानगरपालिका जालना येथील अतिक्रमण निर्मूलन पथकाचे श्री. शामसन छबुराव कसबे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजेच्या सुमारास कुंडलिका नदीवरील संविधान पुलाजवळ ही कारवाई करण्यात आली. या ठिकाणी सय्यद फिर्दौस जहागिरदार (रा. मुर्तिवेस कात्राबाद, जालना) यांनी त्यांच्या स्वतःच्या दुकानाचे टाकाऊ मटेरियल, विटा आणि माती ट्रॅक्टरच्या साहाय्याने थेट नदी पात्रात टाकल्याचे आढळून आले.

कायदेशीर कारवाई नदीच्या नैसर्गिक प्रवाहास बाधा निर्माण केल्यामुळे आणि पर्यावरणाचे नुकसान केल्यामुळे प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. आरोपी सय्यद फिर्दौस जहागिरदार यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता (), २०२३ च्या कलम ३२६() नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार शिवहरी किसनराव दिघोळे करत आहेत.

प्रशासनाचा इशारा शहरातील जलस्त्रोत आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा किंवा राडारोडा टाकणाऱ्यांवर यापुढेही अशाच प्रकारची दंडात्मक आणि फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा महापालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी दिला आहे. सदरील प्रकरणी अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपआयुक्त नंदा गायकवाड आणी सहाय्यक आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## जालन्यात पत्रकाराला अर्वाच्य शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी

# गुत्तेदारावर गुन्हा दाखल करण्याची आपची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेवर हल्ले होण्याचे सत्र थांबताना दिसत नाही. जालना जिल्हा परिषद परिसरात बातमीच्या अनुषंगाने माहिती घेण्यासाठी गेलेले दैनिक जनश्वासचे संपादक भरत मानकर यांना एका गुत्तेदाराने अर्वाच्य शिवीगाळ करत, धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी संबंधित गुत्तेदारावर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी आम आदमी पार्टीच्या वतीने कदीम जालना पोलीस ठाण्यात निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यासंदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १:०० ते १:३० वाजेच्या सुमारास संपादक भरत मानकर हे जिल्हा परिषद जालना येथील बांधकाम विभागात एका बातमी संदर्भात माहिती घेण्यासाठी गेले होते. ते सहाय्यक लेखाधिकारी श्री. हारुण यांच्या दालनात बसलेले असताना, श्री. बांगड नावाचा गुत्तेदार अचानक त्या ठिकाणी आला. कोणतीही पूर्वकल्पना किंवा कारण नसताना, या गुत्तेदाराने भरत मानकर यांना उद्देशून अत्यंत अश्लील आणि अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आमच्या कामाचे देयक रोखण्याचा प्रयत्न करणारा हा पत्रकार कोण? असे म्हणत त्याने मानकर यांना धक्काबुक्की केली. इतकेच नव्हे तर, याचे हातपाय तोडून टाकू अशी उघड धमकी देत त्यांना कार्यालयाबाहेर हाकलण्याचा प्रयत्न केला. पत्रकार संरक्षण कायद्याचे उल्लंघन महाराष्ट्र शासनाने पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी विशेष कायदा लागू केला आहे. मात्र, शासकीय कार्यालयात अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पत्रकाराला अशा प्रकारे धमकावले जाणे, हे या कायद्याचे सरळ उल्लंघन असल्याचे बोलले जात आहे. या घटनेमुळे जिल्ह्यातील पत्रकार वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत असून, संपादक मानकर यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. आम आदमी पार्टी आक्रमक या घटनेची माहिती मिळताच आम आदमी पार्टीचे जालना तालुकाध्यक्ष सुभाष बोर्डे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर केले. पत्रकारितेचे कर्तव्य बजावत असताना अशा प्रकारे गुंडगिरी करणे खपवून घेतले जाणार नाही. संबंधित गुत्तेदार बांगड याच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यासह अन्य कलमान्वये तात्काळ गुन्हा दाखल करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा सुभाष बोर्डे (तालुकाध्यक्ष, आप, जालना) यांनी दिला आहे. संबंधित गुत्तेदार श्री. बांगड याच्यावर तात्काळ एफआयआर दाखल करावा. संपादक भरत मानकर आणि त्यांच्या दैनिकाच्या प्रतिनिधींना पोलीस संरक्षण मिळावे. शासकीय कार्यालयात पत्रकारांना धमकावणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. या प्रकरणाचा पुढील तपास कदीम जालना पोलीस करत असून, पोलीस काय कारवाई करतात याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



## लिटिल सनशाईन इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन

# विविध वेशभूषेने जिंकली प्रेक्षकांची मने




**जालना । प्रतिनिधी -** शहरातील पाठक मंगल कार्यालय येथे लिटिल सनशाईन इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कलागुणांनी आणि आकर्षक वेशभूषेने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपनगराध्यक्ष खुशालसिंह ठाकूर होते. मराठा महासंघाचे राष्ट्रीय विभागीय चिटणीस अरविंदराव देशमुख यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक राम निवासजी गर्ग नगरसेविका संध्या देठे, नगरसेवक धनराज ठाकूर, समाजसेविका ज्योती ठाकूर, मराठा महासंघाचे अशोक पडोळ, संतोष कराळे, शक्ती राजपूत, उमेश राजपूत, संगीता राजपूत, पृथ्वीराज राजपूत, संजय देठे, अर्जुन गरड, रोशनी ठाकूर, मंगल ठाकूर यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना खुशालसिंह ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक केले आणि त्यांना उज्वल भविष्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. अरविंदराव देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचे कौतुक केले. शालेय जीवनातच अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.






स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या प्राचार्य रोशनी बायस, अध्यक्ष ॲड. शैलेश देशमुख, पवन बायस, विजयसिंह ठाकूर, नयना ठाकूर यांच्यासह शिक्षिका संगीता यादव, सारिका राय, अर्चना इजाले, मेहराज शेख, रेहाना शेख यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बदनापूर नगर पंचायत कार्यालय येथे पत्रकारांचा सत्कार व सन्मान



**बदनापूर । प्रतिनिधी -** बदनापूर नगर पंचायत चे नूतन नगर अध्यक्षा चित्राताई संतोष पाटील पवार, माजी नगर अध्यक्ष, सर्व नगरसेवक व मुख्याधिकारी विशाल पाटील, तसेच न पं अधिकारी, कर्मचारी, यांच्या तर्फे दर्पण दिनाचे आयोजन करण्यात आले होते, याचेच औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते शाल, पुष्पहार व गौरव चिन्ह देऊन बदनापूर तालुक्यातील सर्व पत्रकारांचा सन्मान आणि सत्कार करण्यात आला, यावेळी उपस्थित मान्यवरांनी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे पत्रकारितेत समर्पित कार्य यावर उजाळा टाकत उपस्थित असलेल्या पत्रकारांना मोलाचे मार्गदर्शन करत संवाद साधला, यावेळी समाजातील घडामोडींचे वस्तुनिष्ठ वार्तांकन करून जनजागृती घडविणाऱ्या पत्रकारांचा सन्मान करून लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली हे विशेष. या प्रसंगी पत्रकारांनी हि नगर पंचायत राबवित असलेल्या अनेक विकास कामे व सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले तसेच काही अपूर्ण राहिलेले कामे व नवीन विकास कामे लवकरात लवकर मार्गी लाऊन नारिकांच्या समस्या सोडवाव्यात असे संवाद साधत असताना नगर पंचायत मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांना सुचविले, तसेच निर्भीड, सत्य, निष्पक्ष व सकारात्मक पत्रकारितेचा संकल्प यावेळी उपस्थित सर्व पत्रकारांनी व्यक्त केला या वेळी सर्व दैनिक, साप्ताहिक वृत्तपत्र आणि न्यूज चॅनेल चे प्रतिनिधी उपस्थित होते.

# बालकामगारांना कामावर ठेवू नये - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात कोणत्याही आस्थापनांनी बालकामगारांना कामावर ठेवू नये, अशा सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दि. ३० रोजी संपन्न झालेल्या बालकामगार व वेठबिगार कृती दलाची बैठकीमध्ये जिल्हाधिकारी मित्तल बोलत होत्या. यावेळी सहाय्यक कामगार आयुक्त यु.स. पडियाल यांच्यासह विविध विभागातील अधिकारी यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात बालकामगार व वेठबिगार बाबत जन जागृती करण्याचे निर्देश दिले. तसेच १४ वर्षाच्या आतील बालकास कामावर ठेवणे व १४ ते १८ वयोगटातील किशोरवयीन कामगारास कामावर ठेवणे कायद्याने गुन्हा असूनख त्याबाबत २० ते ५० हजार रु. दंड व ६ महिने ते २ वर्ष शिक्षेची तरतुद आहे. बालकामगार कामावर ठेवल्याने बालकामगाराचे शारीरिक व मानसिक नुकसान होते. बालकामगारास अत्यंत वेदना होतात व शिक्षणाच्या वयात काम करावे लागल्याने त्यांचे संपूर्ण भविष्य उध्वस्त होते. त्यामुळे जालना जिल्ह्यात कोणत्याही आस्थापनेने, कारखान्याने अथवा हॉटेल, गॅरेज इ. चालकांनी बालकामगारांना कामावर ठेवू नये. कोणत्याही आस्थापनेवर बालकामगार काम करताना आढळून आल्यास त्या संबंधीत आस्थापना मालकाविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे कोणीही बालकामगारांना कामावर ठेवू नये. व बालकामगारांचे भविष्य वाचवावे असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.